# e - Jalseva Bulletin

December 2014

Volume-IV Issue-VIII

## संपादकीय



"सेवा पुस्तक" हा शासनाच्या प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता एक अत्यंत महत्वाचा विषय आहे. सामान्य प्रशासन विभागाने दिलेल्या निर्देशानुसार राज्यातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांचेसाठी "ई सेवा पुस्तक" ही online प्रणाली राबविण्याचे निश्चित केले व जलसंपदा विभागामध्ये या प्रणालीचा पथदर्शी कार्यक्रम कोयना संकल्पचित्र मंडळात राबविण्यात आला. सदर प्रकल्प यशस्वी झाला असुन सदर प्रणाली राज्यातील सर्व कार्यालयामध्ये राबविण्याचे निश्चित करण्यात आले. याबाबत आवश्यक ते प्रशिक्षण या महिन्यात सर्व प्रादेशिक विभागात दृकश्राव्य माध्यमान्वये देण्यात आले. आजतागायत एकूण १२१६ कार्यालयांच्या ५३३ DDO अधिकाऱ्यांची नोंदणी ई सेवा पुस्तक प्रणाली मध्ये करण्यात आली आहे. सेवापुस्तक हा सर्वांचाच सेवा कालावधीतील महत्वाचा अविभाज्य घटक असल्याने यामध्ये सर्वांनी चांगल्याप्रकारे लक्ष दिल्याचे दिसून येत आहे. यानंतर ई सेवा पुस्तकामध्ये स्वत: माहिती भरण्यासाठी "ई लर्निंग सोल्युशन" द्वारे प्रशिक्षण देण्याचे नियोजन आहे. जलसंपदा विभाग हा ई-सेवा पुस्तक प्रणाली कार्यान्वित करण्याच्या बाबतीत आघाडीवर असुन, याप्रणालीमुळे आपल्या सेवा विषयक गरजा पुर्ण होणार आहेत.

सद्यस्थितीत महालेखाकार यांना विभागीय स्तरावरून मासिक लेखे ई जलसेवा प्रणालीच्या एम २४ मोडुल मार्फत सादर केले जातात, त्याच धर्तीवर महामंडळ स्तरावर प्राप्त होणाऱ्या मासिक लेख्याकरिता ई जलसेवा प्रकल्पाअंतर्गत एका समितीचीही स्थापना करण्यात आली आहे. सदर समितीच्या अहवालानुसार महामंडळ स्तरावरील लेखे ठेवण्याच्या पद्धतीमध्ये व सादरीकरणात योग्य तो बदल केला जाईल व त्यानंतर सर्व मासिक लेखे online पध्दतीने सादर केले जातील. यासाठी सर्व महामंडळांनी सक्रिय सहभाग दिलेला आहे.

मकृखोविम, पुणे यांनी महामंडळातील अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता ई-जलसेवा प्रणालीचे दोन दिवसीय प्रशिक्षण नुकतेच त्यांचेकडील मास्टर ट्रेनरच्या मदतीने घेतले आहे. इतर ठिकाणी देखील प्रशिक्षणाची प्रक्रिया सातत्याने चालू ठेवावी. यासाठी मास्टर ट्रेनर त्या त्या ठिकाणी उपलब्ध आहेत. आवश्यकता भासल्यास परिवर्तन व्यवस्थापन कार्यालयाकडून योग्य तो समन्वय केला जाईल. जलसंपदा विभागातील मंडळ कार्यालयाअंतर्गत नाविन्यता गट स्थापन होण्याची प्रक्रिया सुरु झाली असून त्यांच्या बैठका देखील पार पडत आहेत. ही देखील एक नाविन्यपुर्ण बाब आपल्या विभागात सुरु झाली आहे, त्यासाठी सर्वांनी आपले योगदान द्यावे.

मुख्य अभियंता, (जसं) औरंगाबाद कार्यालयाचे धर्तीवर कोयना संकल्पचित्र मंडळ येथे आवक जावक प्रणाली स्थापित करण्यात आली आहे. टप्याटप्याने महाराष्ट्रातील सर्व विभाग कार्यालयापर्यंत ही अत्यंत उपयुक्त प्रणाली आपणास पोचविता येईल. आपल्या विभागामध्ये दृकश्राव्य माध्यमाद्वारे नियमितपणे बैठका होत असून आतापर्यंत कोयना संकल्प चित्र येथील अशा बैठकींची संख्या ५० एवढी झाली आहे. सदर प्रणाली अद्ययावत असुन, विभागाचा मानबिंदु ठरत आहे. मकृकोविम, पुणे व विपाविम, नागपुर येथील मा. कार्यकारी संचालक यांनी आदेशान्वये त्यांच्या आढावा बैठका फक्त दृकश्राव्य माध्यमान्वये घेण्याबाबत परीपत्रक निर्गमित केलेले आहे, त्यांचे अभिनंदन. यामुळे वेळ आणि पैसा यांची बचत होऊन, अधिकाऱ्यांना क्षेत्रीय स्थळी आपले काम करण्यास अधिक वेळ मिळणार आहे. अशाच प्रकारची कार्यवाही इतर महामंडळे, प्रादेशिक कार्यालये, मेरी, वाल्मी यांच्या बैठकीबाबत व्हावी अशी विनंती आहे.

नवनवीन बाबीचा ई जलसेवा अंतर्गत समावेश करण्यासाठी त्याचप्रमाणे ई जलसेवा प्रणालीचा वापर अधिक सुलभ करण्यासाठी आपण प्रयत्न करतो आहोत व यापुढेही यासाठी आपण कटीबद्ध होऊ या.

December 2014

# e - Jalseva Bulletin

## प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र वाल्मी औरंगाबाद यांचे ई-जलसेवा प्रशिक्षणासाठीचे योगदान

डी. एस. कपाटे, कार्यकारी अभियंता व प्राचार्य
प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, औरंगाबाद

ई-जलसेवा म्हणजेच एकात्मिक संगणकिय माहिती प्रणाली हा प्रकल्प शासकिय कामे पारदर्शक, गतिमान व सुकर करणारा व विविध स्तरावरिल माहिती सर्वसामान्यांना सहज उपलब्ध करुन देणारा जलसंपदा विभागाचा मानबिंदू ठरणारा प्रकल्प आहे.

या प्रणालीचा प्रचार व प्रसार होण्याच्या दृष्टीने शासन विभागातिल अधिकारी व कर्मचाऱ्यांकरीता प्रशिक्षण वर्ग व कार्यशाळेच आयोजन करित आहे. महाराष्ट्रात हा प्रकल्प यशस्वीपणे राबविण्याकरिता कोयना संकल्पचित्र मंडळ, पुणे यांना प्राधिकृत केले असुन त्यांच्या सुचनेप्रमाणे महाराष्ट्र अभियांत्रिकी प्रशिक्षण प्रबोधिनी, नाशिक व त्यांचे अंतर्गत प्रादेशिक प्रशिक्षण केंद्रांमार्फत जलसंपदा खात्यातील कर्मचाऱ्यांना ई-जलसेवेचे प्रशिक्षण देण्यात येते



शासनाच्या सुचनेप्रमाणे प्रथमत: १५ सप्टेंबर २०१३ ते १५ ऑक्टोंबर २०१३ या कालावधीत राबविण्यात आलेल्या ई-जलसेवा अभियानांतर्गत प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, औरंगाबाद मार्फत १०२ प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यात आले. या वर्षी देखील १५ सप्टेंबर२०१४ ते १५ ऑक्टोंबर २०१४ या कालावधीत राबविण्यात आलेल्या ई-जलसेवा अभियानांतर्गत प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र, औरंगाबाद मार्फत एकूण १०२ प्रशिक्षणार्थींना ई-जलसेवेचे प्रशिक्षण देण्यात आले. प्रशिक्षणाकरिता मास्टर ट्रेनर म्हणून श्री.चिनावलकर स.अ.श्रेणी-१; श्री.रवि पवार स.अ.श्रेणी-१ व श्री. विशाल खैरनार स.अ.श्रेणी-२ यांनी उपयुक्त मोलाचे मार्गदर्शन केले आणि त्यांना या केंद्रातील श्रीमती रजनी पाटील स.अ.श्रेणी-१, श्री.एस.के.कुलकर्णी शा.अ. व श्री.एस.एस.देशपांडे शा.अ. यांनी सहकार्य केले. ई-प्रशासन प्रकल्प व्यवस्थापन कार्यालयाअंतर्गत परिवर्तन व्यवस्थापन विभागाने या प्रशिक्षणासाठी मास्टर ट्रेनरर्सची व्यवस्था तसेच प्रशिक्षण आराखडा बनविण्याबाबत मोलाचे सहकार्य केले. त्यांच्या मागदर्शनाखाली प्रादेशिक प्रशिक्षण केंद्र,औरंगाबाद मार्फत दिनांक २३ सप्टेंबर २०१३ पासुन आजपर्यंत विविध संवर्गातील एकुण ५६८ प्रशिक्षणार्थींना ई-जलसेवा संगणकीकृतप्रणाली द्वारे प्रशिक्षित करण्यात आले आहे.



## The eJalseva News

- eService Book- DDO registration started successfully across the state. Total 1096 offices & 506 DDOs have been registered so far in eService Book system.
- Inward/outward software installed in PMO.
- Video Conference solution at 18 locations commissioned so far
- A committee is formed for online submission of Irrigation Development Corporation monthly accounts




म.कृ.खो.वि.म. चे कार्यकारी संचालक श्री एस. एम. उपासे Video Conferencing द्वारे महामंडळतील कामकाजाचा आढावा घेताना.

December 2014 e - Jalseva Bulletin

# राज्यभरात गुणवत्ता हमी (Quality Assurance) पंधरवडा राबविणेबाबत



श्री डी डी तवार, अधिक्षक अभियंता
गुण नियंत्रण मंडळ, पुणे

जलसंपदा विभागातील बांधकाम कामाची गुणवत्ता राखण्यासाठी PWD Handbook Chapter 33 (Part I & II) निविदाअंतर्गत तांत्रिक विनिर्दिष्टे, संबंधित भारतीय मानके यामध्ये तरतुदी देण्यात आलेल्या आहेत. कोणतेही बांधकाम हे त्यासाठीच्या नकाशाप्रमाणे आणि विर्निदिष्टे, यानुसार केले जात आहे हे पाहण्याची जबाबदारी महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियम पुस्तिकेअन्वये जे अभियंते त्या कामाच्या मोजमापाची नोंद मोजमाप पुस्तकात व जे अभियंता त्याची टक्केवारी तपासणी करतात त्यांची संयुक्तपणे असते. विशेष चौकशी समितीने आपल्या अहवालात काही बांधकामांच्या गुणवत्तेबाबत आक्षेप उपस्थित केलेले आहेत. त्या दृष्टीने बांधकामावर आवश्यक ती उपाययोजना करणे यासाठी पावले उचलणे आवश्यक आहे, म्हणुन त्या अनुषंगाने क्षेत्रीय स्तरावरील अभियंत्यांना गुणनियंत्रण तसेच गुणवत्ताहमी याबाबतचे ज्ञान वृध्दंगत व्हावे या दृष्टीने जलसंपदा विभागातर्गत सर्व कार्यालयांमध्ये माहे डिसेंबर मध्ये गुणवत्ताहमी पंधरवडा राबविण्याचा निर्णय घेण्यात येत आहे. यासाठी मुख्य अभियंता स्तरावरुनही कार्यक्रम राबविण्यात येत आहे. त्या त्या क्षोदत्रातील नामवंत व्याख्यात्यांना निमंत्रीत करण्यात येणार आहे. याकामी संबंधित गुणनियंत्रण मंडळ व बांधकाम व विभागिय कार्यालये ही बांधकाम कक्षास या कामी मदत करतील. या पंधरवडयातील कार्यक्रमांचे नियोजन मा. मुख्य अभियंता, संकल्प, प्रशिक्षण व धरण सुरक्षितता नाशिक यांचे मार्फत ई-मेल द्वारे सर्वांना कळविण्यात येणार आहे.

उपलब्ध जलसंपत्तीचा वापर करुन पिण्याच्या पाण्याची, शेतीसाठी सिंचनाची व औदयोगिक पाणीवापराची गरज भागविण्यासाठी पाटबंधारे प्रकल्प बांधले जातात. त्यासाठी धरणे, बंधारे, कालवे, वितिरीका  वैगेरे पार्थिव प्रणाली (Infrastructure) उभारतणाची सर्व कामे संकल्पचित्रप्रमाणे व नकाशाप्रमाणे उभारण्यासाठी आणि पुढील कित्येक दशके ती सुस्थितीत यासाठी त्यांच्या बांधकामाचे वेळी गुणवत्तानियंत्रण कसोशीने अमलात आणण्याची आवश्यकता असते. पाटबंधारे प्रकल्पांमध्ये पाणी साठवलेल्या धरणापासून ते थेट शेतात पाणी पोहचेपर्यंत वेगवेगळया प्रकारच्या बांधकामाची सलग साखळी असते व त्यातील एखादा दुवा जरी कमजोर राहिला तरी त्या प्रकल्पाचे संकल्पित उदि्ष्ट पार पाडले जाऊ शकत नाही. यामुळे प्रकल्पातील प्रत्येक घटकाची गुणवत्ता चांगली असणे अत्यंत महत्वाचे आहे.

प्रकल्पातील बांधकामाची संकल्पचित्रे तयार करताना संभाव्य कोणत्याही प्रतिकूल परिस्थितीमध्ये त्याचे स्थैर्य टिकून राहिल (Structural Stability) असे पाहिले पाहिजे. बांधकामात वापरण्यात येणारे साहित्य जसे सिमेंट खडी, वाळु, दगड, माती, मरुम, लोहसळी, वीटा इत्यादी आणि बांधकाम निर्मिती (कार्यकुशलता, Workmanship) ही निविदा तरतुदी बरहुकुम असावी लागते. बांधकाम करताना त्याची गुणवत्ता व रचना संकल्पचित्रप्रमाणे व नकाशे प्रमाणे आहे ना हे ही पहावे लागते. कोणत्याही क्षेत्रात निर्मितीची प्रक्रिया पुर्ण झाल्यावर त्या बाबींचे गुण नियंत्रण करण्यापेक्षा गुणवत्ता हमी (Quality Assuarance) वरच ज्यास्त भर दयावा लागणार आहे. तरच बांधकामे स्थैर्यपुर्वक बनतील व दीर्घ टीकावू होतील. कोणतेही बांधकाम हाताळण्यापुर्वी बांधकामाची गुणवत्ता राखण्याचे ज्ञान, कसब आत्मसात करणे हे त्या त्या अभियंत्याचे कर्तव्य आहे. जर त्या अभियंत्याला गुण नियंत्रणाचे पुरेसे ज्ञान नसेल तर क्षेत्रिय बांधकामावर विपरीत परिणाम निश्चिंतपणे संभवतो.

Quality is never an accident. It is always the result of intelligent effort, there must be a will to produce a superior thing. चांगले बांधकाम केवळ ओघाने किंवा आपोआप तयार होत नाहीच पण केवळ बांधकामाचे घटक चांगले वापरले म्हणून ही बांधकाम उच्चदर्जाचे होईल याची हमी देता येत नाही. कारण कार्यकुशलता किंवा वास्तुनिर्मिती प्रक्रिया (Workmanship) हा देखिल अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. तसेच बांधकाम करणाऱ्या अभियंत्यालाही गुणवत्तेची बांधकाम करण्याची आस असली पाहिजे तरच बांधकाम गुणवत्तेच होऊ शकेल. म्हणुन गुणवत्ता पंधरवडयामध्ये विर्निदिष्टे (Specifications) व नकाशे बांधकाम समयी कशी असावी, बांधकामाची पद्दधती कशी असावी, बांधकाम चालू असताना व पूर्ण झाल्यावर कोणत्या चाचण्या किती बांधकाम झाल्यावर घ्याव्यात या विषयचे प्रशिक्षण बांधकाम कक्ष अभियंत्यांना दिले जाणार आहे. बांधकाम कक्ष व गुणनियंत्रण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत व बांधकामाची गुणवत्ता राखणेकामी एकमेकांची भूमिका ही परस्परांना पुरक अशी आहे. म्हणून आपण सर्वजन हा गुणवत्ता पंधरवडा साजरा करुन या पुढे ही बांधकामाच्या गुणवत्तेसाठी आपण सारे कटिबंद्दध होऊया. धन्यवाद !

Chief Editor
T N Mundhe

Executive Editor
Pravin kolhe

Editorial Board
Mrs Purnima Desai    Mrs Dhanshree Limaye
Mr Nandkishor Ranaware    Mr Avinash Patil